**वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था**

**व्हीआयपी रोड, धरमपेठ, नागपूर - ४४००१०**

**Email: cptp@vanamati.gov.in, vanamati.cptp@gmail.com**
**Ph. No. 0712/2555999, 2541944 Fax No. 2543260**

**एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम – (सीपीटीपी- ५ व ६)**
**(०४ ऑक्टोंबर ते ३० नोव्हेंबर, २०१९)**

## माहितीपत्रिका

सन २०१९ मध्ये एकत्रित परिवीक्षाधीन प्रशिक्षण कार्यक्रम - सीपीटीपी-५ व ६ मध्ये सहभागी होणाऱ्या सर्व अधिकारी प्रशिक्षणार्थ्यांकरिता माहितीपत्रिका :-

सीपीटीपी-५ व ६ मध्ये सहभागी होण्याकरिता अधिकारी प्रशिक्षणार्थ्यांनी खाली दिलेल्या लिंकवर २३ ते २६ सप्टेंबर, २०१९ या कालावधीपर्यंत ऑनलाइन रजिस्ट्रेशन करणे आवश्यक आहे. ऑनलाइन रजिस्ट्रेशन केल्याशिवाय प्रशिक्षणार्थ्याला रुजू करून घेता येणार नाही.

**Website: - http://vanamati.org**

रजिस्ट्रेशकरिता काही अडचण आल्यास खालील नंबरवर संपर्क साधावा.

१. श्री. दिपक कुंभारे :- ७५८८६९०७१०
२. श्री. जीवन पांढरीकर :- ९४०५९१००१४

**संपर्क:**

वसंतराव नाईक राज्य कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, व्हीआयपी रोड, भोले पेट्रोल पंपजवळ, धरमपेठ, नागपूर - ४४००१०

**Web Site Home Page - http://vanamati.gov.in**

**E-Mail - vanamati.cptp@gmail.com, cptp@vanamati.gov.in**

**Telephone: 0712-2543260/2555999**

**Fax: 0712-2543260**

**वनामती टिम:-**

1. **संचालक :- श्री. रविंद्र ठाकरे, भा.प्र.से.**

   **फोन नं.:- Ph. No. 0712-2543260, ई-मेल:- dg@vanamati.gov.in**

2. **सहसंचालक तथा सहयोगी प्राध्यापक :- श्रीमती सुवर्णा पांडे**

   **मो. नं.. - 9823331406, ई-मेल :- srahul.pande@gmail.com**

3. **सहायक प्राध्यापक (वित्त) :- श्री. संदिप खोडवे**

   **मो. नं. - 9422810823, ई-मेल : sandeepkhodwe@gmail.com**

4. **जनसंपर्क अधिकारी :- श्रीमती मंजूषा दुफारे**

   **मो. नं.. - 9970721278, ई-मेल :- manjushaduphare@gmail.com**

5. **प्रशिक्षण समन्वयक :- श्री. मिलिंद तारे**

   **मो. नं. - 9423762731, ई-मेल :- milind.ta@gmail.com**

6. **प्रशिक्षण समन्वयक :- डॉ. किशोर वाघमारे**

   **मो. नं.. - 9823078532, ई-मेल :- prof.kishore@gmail.com**

7. **प्रशिक्षण समन्वयक :- श्री. जगदीश किल्लोळ**

   **मो. नं. - 9421804478, ई-मेल :- jagdishkillol9@gmail.com**

8. **प्रशिक्षण समन्वयक :- श्री. विश्वास पांडे**

   **मो. नं. - 9822219706, ई-मेल :- vishwaspande.vp@gmail.com**

9. **प्रशिक्षण समन्वयक :- श्री. प्रभू थुटे**

   **मो. नं.. - 9423681917, ई-मेल :- prabhuthute4118@gmail.com**

**वाचा :-**

- सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. टीआरएन ०६१८/प्र.क्र ५१/सिपीटीपी -ब दि. १७.०९.२०१९
- सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. टीआरएन ०९१९/प्र.क्र ५७/सिपीटीपी -ब दि. १७.०९.२०१९

**प्रशिक्षण कालावधी व प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी सूचना :-**

- कागदपत्र पडताळणीकरिता **सीपीटीपी- ५ चे परिविक्षाधीन** अधिकारी प्रशिक्षणार्थ्यांनी **३० सप्टेंबर व ०१ ऑक्टोंबर** तसेच **सीपीटीपी- ६ चे परिविक्षाधीन** अधिकारी प्रशिक्षणार्थ्यांनी **०२ ऑक्टोंबर व ०३ ऑक्टोंबर, २०१९ रोजी सकाळी १० ते ५.३० वाजेपर्यंत** वनामती येथे उपस्थित असणे आवश्यक आहे.

**<u>वाहतूक व्यवस्था :-</u>**

वनामती व्हीआयपी रोड, भोले पेट्रोल पंपजवळ, धरमपेठ, नागपूर येथे मध्यवर्ती ठिकाणी आहे. आगमन झाल्यानंतर वनामतीकडून कोणत्याही प्रकारची वाहतूक व्यवस्था पुरविण्यात येणार नाही. तथापि सार्वजनिक वाहतूक जसे की टॅक्सी/ऑटो/सिटी बस सहजपणे उपलब्ध आहेत. वनामती, नागपूर हे विमानतळापासून 12 किलोमीटर अंतरावर व नागपूर रेल्वे स्टेशनपासून 4 किमी अंतरावर आहे.

अधिकारी प्रशिक्षणार्थीने स्वत:चा प्रवास खर्च स्वत: करावा लागेल. टीए/डीए करिता ते आपल्या मूळ विभागाकडे दावा करू शकतात. अधिकारी प्रशिक्षणार्थी यांनी वनामतीच्या वसतिगृहातील स्वागतकक्ष येथे नोंद करणे आवश्यक आहे. नोंद केल्यानंतर अधिकारी प्रशिक्षणार्थी यांना कक्ष देण्यात येतील.

**<u>निवास व्यवस्था :-</u>**

- सीपीटीपी अभ्यास कार्यक्रमादरम्यान, अधिकारी प्रशिक्षणार्थींना वनामती येथील वसतिगृहात राहणे अनिवार्य आहे.
- एकदा पुरविण्यात आलेला कक्ष कोणत्याही परिस्थितीत अधिकारी प्रशिक्षणार्थींना बदलता येणार नाही.
- वसतिगृहातील कक्ष वातानुकूलित यंत्रणेने सुसज्ज आहेत.
- लॉंड्री सेवा देखील देयक स्वरूपात उपलब्ध आहे.
- पती / पत्नी करिता एकत्रित राहण्याची सोय नाही. अधिकारी प्रशिक्षणार्थीने संपूर्ण प्रशिक्षण कालावधीदरम्यान त्यांच्याबरोबर कोणालाही सोबत आणता येणार नाही.

**<u>हवामान :-</u>**

ऑक्टोंबर महिन्यात हवामान थोडे उष्ण असू शकते. या कालावधीत सरासरी तापमान सुमारे 25° ते 28° सेल्सियस असते. त्यामुळे संरक्षणाच्या दृष्टीने अधिकारी प्रशिक्षणार्थींनी येताना रेनकोट, छत्री तसेच अन्य उबदार कपडे सोबत आणावे.

**<u>भोजन सुविधा :-</u>**

प्रशिक्षणार्थ्यांना वसतिगृहातील मेसमध्ये भोजन सुविधा पुरवली जाईल. वसतिगृहातील कक्षांमध्ये स्वयंपाक करण्याची अनुमती नाही. अधिकारी प्रशिक्षणार्थ्यांनी भोजनाच्या वेळी शिष्टाचार व नैतिकतेचे पालन करणे अपेक्षित आहे.

**भोजन वेळ :-**

- नाश्ता सकाळी ८.०० ते ९.००
- दुपारचे जेवण १.३० ते २.३०
- रात्रीचे जेवण ८.०० ते ९.३०

**टिप -** मेसच्या या वेळे नंतर नाश्ता, जेवण मिळणार नाही कृपया याची दक्षता घ्यावी.

**संगणक सुविधा :-**

अधिकारी प्रशिक्षणार्थ्यांकरिता वनामती येथे सुसज्ज संगणक कक्ष आहेत. तथापि, त्यांच्या स्वत: च्या सोयीसाठी, अधिकारी प्रशिक्षणार्थी आपला स्वत:चा लॅपटॉप आणू शकतात.

**ग्रंथालय :-**

वनामतीमधील प्रशासकीय इमारतीत विविध पुस्तके, मासिके तसेच अभ्यासग्रंथांनी समृध्द असलेले ग्रंथालय आहे. ग्रंथालयातील नोटिस बोर्डमध्ये ग्रंथालयाच्या वेळा दर्शविण्यात येतात.

**वैद्यकीय सुविधा :-**

वैद्यकीय सुविधा पुरविण्याकरिता डॉक्टर देय आधारावरील मागणीवर उपलब्ध आहे. महिला वैद्यकीय तपासणीस देखील आवश्यकतेनुसार उपलब्ध करण्यात येतात. वसतिगृह रिसेप्शनिस्ट डॉक्टरांनी निश्चित केलेल्या औषधांची खरेदी करण्यासाठी आवश्यक ती मदत करेल.

**मोबाईल फोन :-**

अधिकारी प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण विभागात मोबाईल फोनचा वापर करण्याबाबत सक्त मनाई आहे. प्रशिक्षण विभागात अधिकारी प्रशिक्षणार्थी (क्लासरूम / लायब्ररी / आयटी लॅब इत्यादी) आढळणारे मोबाईल फोन जप्त करण्यात येतील आणि अधिकारी प्रशिक्षणार्थींवर दंड आकारण्यात येईल. तथापि, अधिकारी प्रशिक्षणार्थी आपल्या वसतिगृहातील कक्षांमध्ये मोबाईल फोनचा वापर करू शकतात.

**शिस्त :-**

अधिकारी प्रशिक्षणार्थी यांच्याकडून शैक्षणिक क्षेत्रातील उत्कृष्ट प्रशिक्षणासाह शिस्त, नैतिक मूल्ये व शारीरिक तंदरुस्ती यांचा उच्च दर्जा वनामतीला अपेक्षित आहे.

- वनामती येथील संपूर्ण निवासादरम्यान अधिकारी प्रशिक्षणार्थी यांच्या वर्तनामध्ये शिस्त, सभ्यता आणि शिष्टाचार असणे अपेक्षित आहे.
- वनामती येथील संपूर्ण प्रशिक्षणाच्या कालावधीत अधिकारी प्रशिक्षणार्थींना कोणतीही रजा मंजूर केली जाणार नाही. प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये निर्धारित केलेल्या सर्व शैक्षणिक आणि गैर-शैक्षणिक उपक्रमांमध्ये अधिकारी प्रशिक्षणार्थी यांची उपस्थिती अनिवार्य असेल.

- प्रशिक्षणार्थ्यांना कार्यालयीन आवाराच्या बाहेर जावयाचे असल्यास हालचाल नोंदवहीत नोंद करावी लागेल तसेच रात्री ९.३० नंतर परत आल्यास सीक्युरिटी गेटवर स्वाक्षरी करावी लागेल.
- कोणत्याही प्रकारचा बेशिस्तपणा सहन केला जाणार नाही.

मद्यपान, धूम्रपान आणि कोणत्याही प्रकारच्या असभ्य वागणूकीवर सक्त कारवाई करण्यात येईल. वनामती एक सरकारी संस्था आहे आणि उपरोक्त नमूद बाबींचे उल्लंघन केल्यास प्रशिक्षणार्थी अधिकारी वनामतीतून काढून टाकण्यासाह अनुशासनात्मक कारवाईसाठी जबाबदार राहील.

**इतर उपक्रम :-**

अधिकारी प्रशिक्षणार्थी आपल्या स्वत: च्या वापरासाठी त्यांची वैयक्तिक गेम किट, संगीत साधने आणि कॅमेरा तसेच इतर साहित्ये आणू शकतात. स्वतःच्या उपकरणासाठी अधिकारी प्रशिक्षणार्थी स्वत: जबाबदार असतील. तसेच या साधनांचा त्रास त्यांचे खोलीतील व वसतिगृहातील इतर सहकाऱ्यांना होणार नाही याची काळजी घ्यावी लागेल.

**महत्वाचे मुद्दे :-**

- पायाभूत प्रशिक्षण कालावधी व अनिवार्य संलग्नता कार्यक्रमादरम्यान अधिकारी प्रशिक्षणार्थ्यांना दरमहा रु. 20000/- ठोक अनुदान अनुज्ञेय आहे. महाराष्ट्र शासनाच्या संबंधित विभागाकडून अनुदान प्राप्त झाल्यावरच याचे वाटप करण्यात येईल.
- तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रमादरम्यान अधिकारी प्रशिक्षणार्थ्यांना पगारातील फरक संबंधित विभागाकडून अदा करण्यात येईल.
- वैयक्तिक खर्चासाठी एक महिनापुरेल एवढे पैसे स्वत: सोबत आणावे.
- पगार व सेवार्थ माहिती तयार करण्याकरिता आधार, शाळा सोडल्याचा दाखला (जन्म तारखेसाठी), राष्ट्रीयकृत बँकेचा तपशील, कायम व तात्पुरता निवासी पत्ता पुरावा, जुनी सेवा (सरकारी सेवा फक्त) सेवार्थ आयडी क्रमांक, जीपीएफ / डीसीपीएस क्रमांक, शासकीय सहभागाची तारीख सेवा, नामनिर्देशित तपशील (नाव, जन्म, संबंध) ही कागदपत्रे प्रशिक्षण कार्यक्रमाच्या प्रारंभापासून एका आठवड्यात सादर करणे अनिवार्य आहे.

## अत्यावश्यक बाबी

वनामती येथे रुजू होताना अधिकारी प्रशिक्षणार्थ्यांनी खालील बाबींची न विसरता पूर्तता करणे आवश्यक आहे.

**वेशभूषा :-**

योग्य शिष्टाचार आणि वेशभूषा हे वनामती येथील प्रशिक्षणाचा एक अविभाज्य भाग आहे. अधिकारी प्रशिक्षणार्थ्यांकडून प्रशिक्षण विभाग आणि कॅम्पसमध्ये प्रत्येक वेळी योग्यरित्या वेशभूषा करण्याची अपेक्षा आहे. तसेच वनामतीचे ओळखपत्र घालणे आवश्यक आहे.

वनामती येथील प्रशिक्षणादरम्यान अधिकारी प्रशिक्षणार्थींनी औपचारिक आणि अनौपचारिक अशा दोन्ही प्रकारचे पुरेसे कपडे घेऊन येणे आवश्यक आहे.

## ड्रेस कोड

### 1. उद्घाटन कार्यक्रमादरम्यान

कार्यक्रमाचे उद्घाटन (०४ ऑक्टोंबर, २०१९), राष्ट्रीय उत्सव, स्वातंत्र्य दिन आणि पायाभूत प्रशिक्षणाच्या समारोप प्रसंगी अधिकारी प्रशिक्षणार्थींना खालील ड्रेस कोड पाळणे अनिवार्य आहे.

- पुरुष अधिकारी : काळ्या रंगाचा जोधपुरी ड्रेस आणि गडद रंगाच्या सॉक्ससह काळे लेसचे शूज.
- महिला अधिकारी : पांढऱ्या रंगाची सोनेरी काठाची साडी

### 2. औपचारिक कार्यक्रम

- महत्वाच्या संस्थांना भेट देणे, गट फोटो इ. तसेच इतर औपचारिक कार्यक्रम प्रसंगी पुरुष अधिकाऱ्यांनी लांब बाहयांचे औपचारिक सूट (शक्यतो गडद रंगांचे) घालणे आवश्यक आहे.
- महिला अधिकारी प्रशिक्षणार्थींनी औपचारिक प्रसंगी साडी व शूज / सँडल्स घालणे आवश्यक आहे.

### 3. वर्ग, भोजनालय व ग्रंथालय

- पुरुष अधिकाऱ्यांनी औपचारिक शर्ट आणि ट्राऊजर तसेच लेदर शूज घालणे आवश्यक आहे तसेच महिला अधिकारी प्रशिक्षणार्थींनी साडी / सलवार-कमीज व शूज / सँडल्स घालणे आवश्यक आहे.
- सर्व अधिकारी प्रशिक्षणार्थींना नेहमीच नीटनेटके असणे आवश्यक आहे. सर्व अधिकारी प्रशिक्षणार्थी यांनी किमान 5 जोड्या औपचारिक ड्रेस आणावे. शैक्षणिक वेळेमध्ये किंवा भोजनालय / ग्रंथालयामध्ये कॅज्युअल पोशाखाला परवानगी दिली जाणार नाही.
- स्नीकर्स, स्पोर्ट्स बूट आणि टेनिस शूज केवळ पीटी / गेम्स च्या वेळी वापरता येतील.
- बाहेरील उपक्रमाच्या वेळी अनौपचारिक कपडे परिधान करता येऊ शकतात.

**4. योगा/ क्रीडा उपक्रम**

- सर्व प्रशिक्षणार्थी अधिकाऱ्यांसाठी, पुरुषांनी व महिलांनी  व्हाईट कॅनव्हास शूज / स्नीकर्स आणि व्हाईट सॉक्ससह ट्रॅक-सूट (गडद रंग) आणि पांढऱ्या रंगाचे  टी-शर्ट घालणे अनिवार्य आहे.
- अधिकारी प्रशिक्षणार्थींनी पीटी आणि इतर उपक्रमांकरिता चांगल्या दर्जाचे जॉग्गिंग / रनिंग शूज (पांढऱ्या रंगाचे  अनिवार्य) एक जोडी आणावे.
- सकाळी पीटी / योगा आणि ट्रेकिंग आणि फिरणे अनिवार्य आहे तसेच ही बाब अधिकारी प्रशिक्षणार्थीच्या अंतिम मूल्यांकनाचा एक भाग आहे. कोणत्याही अधिकारी प्रशिक्षणार्थ्याला यातून सूट देता येणार नाही. तसेच वैद्यकीय समस्या असल्यास. संबंधित वैद्यकीय इतिहासाची माहिती तसेच कागदपत्रांची पूर्तता करणे आवश्यक आहे.
- वनामती येथील वसतिगृहात जिम सुविधा देखील उपलब्ध आहे.

वरील माहिती अधिकारी प्रशिक्षणार्थींनी योग्यरित्या वाचली पाहिजे आणि त्यांनी उपरोक्त प्रमाणे कपडे आणि इतर वस्तू तसेच कागदपत्रे आणणे आवश्यक आहे. संपूर्ण प्रशिक्षण कार्यक्रम प्रभावी व यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी उपरोक्तप्रमाणे अटी पाळणे बंधनकारक राहील.

**वनमातीमध्ये आपले स्वागत आहे !**